Akshardhara Research Journal
Single Blind Peer-Reviewed & Refereed International Research Journal
E ISSN -3048-8095 / February 2025 / Special Issue 1 Volume V

31

# स्त्रीवादी साहित्यातून स्त्री साहित्यीकांनी हाताळलेले प्रश्न : एक चिकित्सा

**प्रा. डॉ. सुनिलदत्त नारायण गोडसे**
सहयोगी प्राध्यापक मराठी
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय ओंदे, ता. विक्रमगड, जि. पालघर

---

**प्रस्तावना :**

ब्रिटीश आमदानीत शिक्षण प्रसारामुळे आधुनिक विचारांचे नवे पर्व सुरु झाले. नवशिक्षीतांकडून वेगवेगळया विषयांवरचे प्रबोधन सुरु झाले. आपल्या लिखानातून साहित्यीक समाजातील समस्यांना वाचा फोडू लागले. त्यात स्त्रियांना भेडसावणा-या समस्याही येवू लागल्या, त्यांचे प्रतिबिंब त्या काळात निर्माण झालेल्या ग्रंथात आणि पुस्तकांत येऊ लागले. ब्रिटीशांच्या आमगनामुळे भारतीय समाजातील धार्मिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, शैक्षणिक जीवन यामध्ये प्रचंड घुसळण होऊ लागली. अनेक प्रकारच्या चळवळींचे त्यामुळे बीजारोपण झाले. स्त्रिया शिक्षीत होऊ लागल्याने त्यांच्यावरील अन्याय अत्याचाराचे हुंकार त्यांच्या लिखानातून उमटू लागले, पुढे त्यातून स्त्रीवादी चळवळीचे बीजावरोपण झाले.

स्त्री साहित्यीकांनी साहित्याच्या क्षेत्रात स्वकर्तृत्वाने अनेक मापदंड निर्माण केले. अनेक मापदंड निर्माण केले. स्त्रीया सामाजिकदृष्टया बदलत्या वास्तवाचं भान देणा-या वैचारिक लेखन करीत होत्या. यादृष्टीने दुर्गाबाई भागवत, इरावती कर्वे हया आघाडीच्या स्त्री साहित्यिक होत्या. आपल्या लेखनातून स्त्रीच्या बदलत्या भावविश्वाचे चित्रण व त्या आपल्या साहित्यातून करीत होत्या. याच काळात पद्मा गोळे, इंदिरा संत, अरूणा ढेरे, यांसारख्या कवयत्रिंनी आपल्या कवितांमधुन स्त्रीयांच्या मानसिक, भावनिक बदलांचे चित्रण आपल्या साहित्यातून केले याच काळात मालतीबाई बेडेकर यांनी विभावरी शिरुरकर या टोपण नावाने लेखन करून विधवा परित्यक्ता, हुंडा देण्याची आयपत नसणा-या गरीब मुलींची खोळंबलेली लग्न, लग्नाचे वय उलटून गेलेल्या स्त्रीया त्यांच्या 'कळयांचे नि:श्वास' हया कथासंग्राहात तर सुशिक्षित स्त्रीयांची घरात व समाजात होणारी घुसमट त्यांच्या 'शबरी' या कादंबरीत दिसुन येते.

1975 च्या आसपास अनेक स्त्रीसाहीत्यिकांनी स्त्रीयांचे प्रश्न, स्त्रीचं समाजातील असलेले दुय्यम स्थान माणुस म्हणून न मिळणारी वागणूक, तिचे मानसिक- शारिरीक होणारे बेदखल आयुष्य, काळाच्या ओघान निर्माण होणारे गुंतागुंतीचे प्रश्न,त्याच्या मुक वेदना योगिनी जोगळेकर शैलजा राजे, गिरिजा कीर, शकुंतला गोगटे यांनी आपल्या साहित्यातून मांडलेले आहेत. तत्कालीन स्त्रीभावविश्वाचे दर्शन अतिशय उत्कटतेने गौरी दशेपांडे , प्रिया तेंडुलकर हया साहित्यीकांनी आपल्या साहित्यात मांडले आहेत. त्यांच्या साहित्यातुन खास करून प्रौढ कुमारिका घटस्फोटित स्त्रीचा यांचे प्रश्न मांडले गेले आहेत. शहरी स्त्रीयांचे प्रश्न आणि ग्रामीण स्त्रीयांचे प्रश्न वेगळे असल्याने हया स्त्रीवादी साहित्यीकांच्या लक्षात आल्याने ते वेगवेगळया साहित्यकृतींच्या माध्यमातुन प्रश्न मांडुन राज्यकर्ते, प्रशासक आणि समाजमानाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केल्याचे दिसुन येते. सरोजिनी बाबर यांचा 'सुगरणीचा खोपा' आणि प्रतिक्षा इंगोले यांचा 'भुईची लेक' इ. साहित्यातून अधोरेखित होताना दिसते.

स्त्रियांचे प्रश्न सुटावेत किंबहुना त्या प्रश्नांची धार बोथट व्हावी यासाठी अनेक स्त्रिसाहित्यीकांनी कधी स्त्रीवादी चळवळीचा आधार घेत तर कधी साहित्याचे व्यासपीठ गाजवत, साहित्य संमेलनात विद्रोही सूर आवळत तर कधी न्याय मिळत नाही असे वाटले तर आंदोलनाचा पवित्रा घेत आपले हुंकार समाज मनाच्या कानावर घालण्याचे सोडले नाही. आज स्त्रीवादी साहित्याचे मोठे दालन सर्वच भाषा साहित्यात विपूल प्रमाणात उपलब्ध असल्याचे दिसते. ग्रामीण साहित्याबरोबरच स्त्री दलीत साहित्यकारांनी सुध्दा दलीत स्त्रीच्या वेदना व दु:ख तीव्रतेने मांडण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते. उर्मिला पवार हयांच्या 'चौथी भिंत' व 'सहाव बोट' या कथासंग्रहाम कष्टकरी दलीत स्त्रीच्या दु:ख वेदना व्यक्त झालेल्या आहेत. सावित्रीबाई फुले हयांच्या शाळेतील मुक्ता नावाच्या मुलीने सर्व प्रथम आपल्या निबंधातून स्त्री वेदना मांडण्याचा प्रयत्न केल्याचे दिसते. त्याकाळात स्त्री म्हणून तीला पडलेले प्रश्न तिनेधीटपणे आपल्या निबंधात मांडले.

स्वातंत्र्यप्राप्तीच्या सुमारास स्त्रियांसाठी प्रसिध्द होणा-या काही रंजनवादी मासिकातून नवी नवी माहिती आणि प्रोत्साहन म्हणून केलेले लिखान यातून स्त्रीयांचे प्रश्न हाताळणारी स्त्रीवादी साहित्यकांची एक मजबूत फळी निर्माण झाली. स्त्रीयांची वैचारिक जागृती घडवीत त्यांना काळाचे भान देण्याचं कार्य शांताबाई किर्लोस्कर व विद्याबाळ सारख्या स्त्री साहित्यकांनी केल्याचे दिसते.

स्त्रीयांच्या प्रश्नावर समाजाचे प्रबोधन करणारे मासिक "बायजा" सौदामिनी राव यांनी 1975 च्या सुमारास सुरु केले. 1978 मध्ये मिनाक्षी साने यांचं 'महिला आंदोलन पत्रिका' सुरु झाले, त्यामध्ये भरपूर प्रमाणात स्त्रीयांच्या प्रश्नांची चर्चा करण्यात येऊ

Akshardhara Research Journal
Single Blind Peer-Reviewed & Refereed International Research Journal
E ISSN -3048-8095 / February 2025 / Special Issue 1 Volume V

लागली, पुढे 'स्त्री उवाचं' नावाच मासिक सुरु झाले त्यामध्येही स्त्रीयांच्या प्रश्नांना प्राधान्य देण्यात येऊ लागले. हया सर्व लिखाणाचं प्राधान्यक्रम हया स्त्रीयांच्या प्रश्नांची व्यापक प्रमाणात चर्चा करणे हा होता आणि त्यास ब-यापैकी यश आल्याचे पुढील अभ्यासात दिसून आले. या साहित्याची प्रेरणा घेवून पुढे अनेक स्त्रीया लिहू लागल्या, आपले प्रश्न स्त्री मासिकांच्या व्यासपीठावर नेऊ लागल्या.

स्त्रीवादी साहित्यामध्ये प्रामुख्याने बालविवाह, विधवाविवाह, स्त्रीशिक्षण, स्त्री जीवनातील व्रत वैकल्य, बाल-जरठ विवाह, परितक्त्या स्त्रियांचे प्रश्न, प्रौढ कुमारिकांचे प्रश्न, कुमारीमातांचे प्रश्न, स्त्रीभ्रुण हत्या इ. विषयांवर समाजाचे लक्ष वेधणे व स्त्रीयांना सुध्दा त्यांचे प्रश्न मांडण्याचे व्यासपीठ उपलब्ध करुन देणे हा दिसतो. त्यासाठी स्त्रीलेखिका यशस्वी झाल्याचे दिसून येते.

**समारोप :**

1960 ते 2000 या कालखंडात स्त्रीलेखकांनी कथा, कादंबरी, नाटक, कविता, आत्मकथन इ. साहित्यप्रकारांचा विपूल प्रमाणत वापर करुन स्त्रीप्रश्नांना मोठया प्रमाणात वाचा फोडण्यात यशस्वी ठरले. त्याचा परिणाम म्हणून सर्वच स्तरातून स्त्रीयांच्या प्रश्नांची दखल घेणे समाज मनास भाग पडले. आज वेगवेगळया प्रकारचे कायदे स्त्रीयांचे प्रश्न सुटावेत यादृष्टीने अस्तित्वात असल्याचे पहायला मिळते. भविष्यात अधिक प्रभावीपणे स्त्रीयांचे प्रश्न मार्गी लागतील असू दिसून येते.

**निष्कर्ष :**

1) इंग्रज आमदानीत झालेल्या शिक्षण प्रसारामुळे स्त्रीया शिक्षीत होवून त्यांच्यात आत्मभान व आत्मविश्वास जागृत झाला.
2) स्त्रीया आत्मनिर्भर होऊ लागल्याने आपल्याभोवती आवळलेल्या पाशांविरुध्द बंड पुकारु लागल्या.
3) स्त्रीसाहित्यकांनी आपल्या कथा, कादंब-या, कविता, आत्मपर लिखानात स्त्रीसंदर्भातले विविध प्रश्न जसे हुंडा, विधवा विवाह, सतीचाल, बालविवाह, स्त्रीभ्रुण हत्या अशा विवध विषयांना वाचा फोडली.
4) स्त्री साहित्यकांनी आपल्या विविधांगी साहित्यातून मांडलेल्या भुमिकेमुळे शासनला स्त्रीयांच्या विकासा संदर्भात विविध चांगले कायदे करणे भाग पडले.
5) आज स्त्रीवादी साहित्य प्रवाह मोठया आत्मविश्वासाने पुढे मार्गक्रमण करताना दिसतो.

**संदर्भ -** 1) साने मिनाक्षी 'महिला आंदोलन पत्रिका'
2) बाळ विद्या 'मिळून सा-याजणी'
3) राव सौदामिनी 'बायजा'
4) इंगळे प्रतिभा 'भुईची लेक'